पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १०९ /२०२४ दि. २९/०५/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**विषय :–** वाहतूक अधिसूचनेमध्ये सुधारणा होणे बाबत.

**संदर्भ :–** जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/१०७/२०२४, दि. २३/०५/२०२४.

*******

**ज्याअर्थी**, नारपोली वाहतूक उपविभागाचे हद्दीत सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचे कडून घोडबंदर रोडवर गायमुख घाटात ७०० मीटर लांब रस्त्याचे सॉईल स्टॅबिलायजेशन करून मजबूतीकरण करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी**, वर नमूद संदर्भान्वये सर्व जड अवजड वाहने नारपोली वाहतूक उपविभागाचे हद्दीत माणकोली नाका व कशेळी मार्गे प्रवेश करीत आहेत. त्यामुळे नमूद मार्गावर दैनंदिन वाहतुकीबरोबर अतिरिक्त जड अवजड वाहनांची वाहतुक सुरू राहिल्यास वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होवू शकतो. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई, ठाणे, कळवा, मुंब्रा कडून नारपोली वाहतूक उपविभागाचे हद्दीत माणकोली/कशेळी मार्गे गुजरात कडे जाणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **माणकोली/कशेळी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने वडपे नाका – भिवंडी – वाडा, विक्रमगड – मनोर मार्गे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद –** २) गुजरात कडून मुंबई, ठाणे, कळवा, मुंब्रा कडे जाणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **जव्हार फाटा, मनोर येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मनोर – विक्रमगड – वाडा – भिवंडी – खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील

सदर अधिसूचना दि.२९/०५/२०२४ ते दि. ०७/०६/२०२४ रोजीपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**

**मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर**
**मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर**
**मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर**
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—२/वि.शा.ठाणे.

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

<u>प्रत</u> :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :— सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.